# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २०४–२०१०/ दिनांक :

श्री. शंकर नंद्याप्पा मुडशी,
मु. पो. उमराणी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. ए. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य
४)

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शंकर नंद्याप्पा मुडशी, मु. पो. उमराणी, ता. जत, जि. सांगली यांनी प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१० मधील तरतुदीनुसार तक्रार (गाऱ्हाणे) दि. १४.९.२०१० रोजी दाखल केले. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार ग्राहक यांनी त्यांच्या शेतीपंपास वीज पुरवठा करणारा रोहित्र दि. ३.७.२०१० ला नादुरुस्त झाल्याने तो बदलून मिळावा यासाठी वितरण कंपनीकडे सामुदायिक शेतकऱ्यांच्या सह्यांचा अर्ज जत उप विभागाकडे दि. ६.७.२०१० ला दिला. सदरचे रोहित्र न बदललेने दि. ७.७.२०१० रोजी कार्यकारी अभियंता यांना फॅक्सद्वारे कळविले. तक्ररदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार क्र. २६२ दि. ८.७.२०१० ला दाखल केली. अंतर्गत कक्षाने आजतागायत कोणताही आदेश पारीत केलेला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत – सदर रोहित्र वितरण कंपनी कवठे महांकाळ यांनी कोणत्या गेट पासने जत उप विभागास दि, जत उप विभागाने कोणत्या गेट पासने व ज्या वाहनाने वाहतूक करुन उमराणी येथे बसविले याची योग्य ती कागदपत्रे वि.प.ने मंचाकडे सादर करावीत व झालेल्या विलंबाबाबत कृती मानकातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी. तसेच कृती मानके विनियमातील कम १२.१ त्रस्त व्यक्तीला व त्याचप्रमाणे इतर त्रस्त झालेल्या या ग्रुपवरील सर्व ग्राहकांनाही भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १८.१०.२०१० च्या लेखी अहवालात नादुरुस्त रोहित्र बदलणे करीता विभागीय कार्यालय फिल्टर युनिट कडून गेट पास क्र. ४१७ दि. ९.७.२०१० रोजी मिळालेनंतर वाहन क्र. एमएच १० झेड ६३०१ या वाहनातून श्री. एम.व्ही. माळी, कनिष्ठ तंत्रज्ञ व इतर कर्मचारी यांचे मदतीने त्याचदिवशी म्हणजे दि. ९.७.२०१० रोजी रोहित्र बसवून चालू करुन देण्यात आल्याचे म्हटले आहे.

प्रस्तुतचा तक्रार आज दिनांक २१.१०.२०१० ला मंचासमोर सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे कार्यकारी अभियंता/ नोडल ऑफीसर सांगली श्री. क्षीरसागर, कनिष्ठ अभियंता श्री. राजमाने, जत उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी मंचासमोर ग्राहकाच्या व स्वत:च्या सहीचा दि. २०.१०.२०१० चा अर्ज दाखल केला, त्यामध्ये सहाय्यक अभियंता, जत उप विभाग यांनी रोहित्र बदलणेस विलंब झाल्याबद्दल दिलगीरी व्यक्त केली आहे तसेच रोहित्र जळणेपूर्वी तक्रारदार यांनी स्वखर्चाने कवठे महांकाळ ते उमराणी असे एकूण तीन वेळेला विविध काळी रोहित्र जळलेले वेळी वाहतूक केलेली आहे हा झालेला खर्च रु. २५००/– दर वेळी या प्रमाणे तीन खेपेचे भाडे एकूण रु. ७५००/– ही १५ दिवसांत वि.प. रोख देणार आहे असा समझोता झाला असल्याने ग्राहकाने तक्रार अर्ज मागे घेतला आहे त्यावर सहाय्यक अभियंता, जत यांचीही सही आहे. तक्रारदार यांस १५ दिवसांत वाहतुकीचा खर्च रु. ७५००/– वि.प.ने देणेचा आहे या अटीवर ग्राहकाने तक्रार अर्ज मागे घेतला आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) ग्राहक व वितरण कंपनी यांच्यात झालेल्या समझोत्याप्रमाणे वि.प.ने त्यांना १५ दिवसांत वाहतूक खर्चाचे रु. ७५००/– देण्याचे आहेत, त्यामुळे तक्रार मागे घेत असल्याचे तक्रारदार यांनी प्रतिनिधीमार्फत कळविले आहे. तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : २१.१०.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष